*खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे*

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर

*मराठी विभाग आयोजित*

## मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रम अहवाल

## दि. ८ मार्च २०१७

---

मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. दिलीप मुळूक, मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख डॉ. संजय शिंदे, प्रा. प्रतिमा लोणारी, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा.डी.एम.मारकड, प्रा. वर्षा कांबळे, प्रा. गणेश मोढवे आणि प्रथम वर्ष वाणिज्य शाखेचे विद्यार्थी उपस्थित होते. या प्रसंगी बोलताना रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. दिलीप मुळूक यांनी विद्यार्थिनींनीना आपल्या जीवनातील उत्कर्षबिंदू सहजरीत्या गाठायचा असेल तर आत्मविश्वास आणि आत्मनिर्भरतेचे सामर्थ्य त्यांनी ओळखणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन केले. प्रा. दिलीप मुळूक यांनी महिलांनी जगातील सर्वच क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे असे सांगून विद्यार्थिनींनीही स्वतःला सिद्ध करणे गरजेचे आहे. महिला निसर्गतः पुरूषांपेक्षा अधिक सहनशील व संवेदनशील असतात. या गुणांचा उपयोग करून मुलींनी आपल्या व्यक्तीमत्त्वाचा विकास करताना स्वावलंबी व आत्मनिर्भर बनायला हवं. पारंपरिक शिक्षणाबरोबरच आरोग्य, गृहविज्ञान व व्यवहारकुशलता यांचे शिक्षणही मुलींनी घ्यायला हवं असं आवाहन केले.

प्रा. प्रतिमा लोणारी यांनी विद्यार्थिनींना शारीरिक व मानसिक क्षमता वाढविण्याचे आवाहन करताना व्यायाम व आहार यांचे महत्त्व सांगितले. प्रथम वर्ष वाणिज्य शाखेची विद्यार्थिनी कु. जुई सांडभोर हिने नुकत्याच अहमदनगर जिल्ह्यातील भांडारदरा धरणाजवळील रतनगडावर केलेल्या ट्रेकिंगचे अनुभव सांगितले. म्हैसाळमधील बेकायदा गर्भपात करणाऱ्या डॉ. बाबासाहेब खिद्रापुरे याचा व संबंधित पालकांचा तीव्र शब्दात निषेध करण्यात आला. या निमित्ताने उपस्थित विद्यार्थ्यांनी आदिशक्तीच्या रूपातील स्त्रीयांचा आदर करण्याची , त्यांना समतेची व सन्मानाची वागणूक देण्याची तसेच स्त्री जन्माचे स्वागत करण्याची शपथ घेतली. कायर्यक्रमाचे सूत्रसंचालन, प्रास्ताविक व शपथेचे वाचन मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख डॉ संजय शिंदे यांनी केले तर आभार प्रा.मच्छिंद्र मुळूक यांनी मानले.

डॉ संजय शिंदे<br>
मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख



प्रा. प्रतिमा लोणारी या
विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना



स्त्री जन्माचे स्वागत करणारी शपथ घेताना
प्राध्यापक व विद्यार्थी

**04 प्रभात** पुणे, शुक्रवार, दि. १० मार्च २०१७

# आत्मनिर्भरतेचे सामर्थ्य ओळखा

## प्रा. दिलीप मुळूक : राजगुरू महाविद्यालयात महिला दिनानिमित्त विविध कार्यक्रम

**शारीरिक व मानसिक क्षमता वाढवा –प्रा. लोणारी**

**सांगलीच्या खिद्रापुरे डॉक्टरचा महिलांनी केला तीव्र निषेध**



राजगुरूनगर : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त शपथ घेण्यात आली.

राजगुरूनगर, दि. ९ (प्रतिनिधी) - विद्यार्थिनींना आपल्या जीवनातील उत्कर्षबिंदू सहजरीत्या गाठायचा असेल तर आत्मविश्वास आणि आत्मनिर्भरतेचे सामर्थ्य त्यांनी ओळखणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. दिलीप मुळूक यांनी केले. हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात मुळूक बोलत होते. याप्रसंगी डॉ. संजय शिंदे, प्रा. प्रतिमा लोणारी, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. डी. एम. मारकड, प्रा. वर्षा कांबळे, प्रा. गणेश मोढवे आणि प्रथम वर्ष वाणिज्य शाखेचे विद्यार्थी उपस्थित होते.

प्रा. दिलीप मुळूक म्हणाले की, महिलांनी जगातील सर्वच क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे. विद्यार्थिनींनीही स्वतःला सिद्ध करणे गरजेचे आहे. महिला निसर्गतः पुरुषांपेक्षा अधिक सहनशील व संवेदनशील असतात. या गुणांचा उपयोग करून मुलींनी आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करताना स्वावलंबी व आत्मनिर्भर बनायला हवे. पारंपरिक शिक्षणाबरोबरच आरोग्य, गृहविज्ञान व व्यवहारकुशलता यांचे शिक्षणही मुलींनी घ्यायला हवे असे आवाहन त्यांनी केले.

प्रा. प्रतिमा लोणारी यांनी विद्यार्थिनींना शारीरिक व मानसिक क्षमता वाढविण्याचे आवाहन करताना व्यायाम व आहार यांचे महत्त्व सांगितले. प्रथम वर्ष वाणिज्य शाखेची विद्यार्थिनी जुई सांडभोर हिने नुकत्याच अहमदनगर जिल्ह्यातील भांडारदरा धरणाजवळील रतनगडावर केलेल्या ट्रेकिंगचे अनुभव सांगितले. म्हैसाळमधील बेकायदा गर्भपात करणाऱ्या डॉ. बाबासाहेब खिद्रापुरे याचा व संबंधित पालकांचा तीव्र शब्दात निषेध करण्यात आला.

या निमित्ताने उपस्थित विद्यार्थ्यांनी आदिशक्तीच्या रूपातील स्त्रियांचा आदर करण्याची, त्यांना समतेची व सन्मानाची वागणूक देण्याची तसेच स्त्री जन्माचे स्वागत करण्याची शपथ घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, प्रास्ताविक व शपथेचे वाचन मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख डॉ संजय शिंदे यांनी केले तर प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी आभार मानले.